**ठळक बातम्या**

- भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- मध्यम आकाराच्या लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला संरक्षण मंत्र्यांची मान्यता

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण

**आणि**

- कर्नाटक, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज

**<><><><><>**

भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गांधीनगर इथे गुजरात शहरी विकासाची २० वर्षं पूर्ण केल्याबद्दल आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जगातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेच्या क्रमवारीत ११व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज गांधीनगरमध्ये 'ऑपरेशन सिंदूर सन्मान यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी

त्यांच्यासोबत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिकांनी ऑपरेशन सिंदूरसाठीचे फलक आणि तिरंगा हातात घेऊन घोषणा दिल्या. मोदी यांनी काल वडोदरा, भूज आणि अहमदाबाद इथेही रोड शो केला होता.

<><><><><>

मध्यम आकाराच्या लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मान्यता दिली आहे. नव्या स्वरूपात हा कार्यक्रम राबवताना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांना समान संधी मिळेल असं संरक्षण मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या लढाऊ विमानांचं उत्पादन देशात अधिक क्षमतेनं होऊ लागलं की संरक्षण क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेच्या वाटेवर महत्त्वाचा टप्पा पार होईल.

<><><><><>

दहशतवादाविरोधात भारताच्या शून्य सहिष्णूतेच्या धोरणाचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळं सध्या विविध देशांच्या भेटीवर आहेत. भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने काल फ्रान्समध्ये भारतीय समुदायाशी संवाद साधला. दहशवादविरोधी लढ्यात संपूर्ण देशाची एकजूट असल्याचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्याच्या प्रयत्नाचा एक भाग असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. या शिष्टमंडळातील राज्यसभेचे खासदार गुलाम नबी आझाद यांनी भारताला शेजारी देशाबरोबर शांतता हवी असली तरीही हल्ला झाल्यास भारत शांत राहाणार नाही, असं स्पष्ट केले. हे शिष्टमंडळ पुढे इटली, युके, जर्मनी, डेन्मार्क आणि युरोपियन युनियनला भेट देणार आहे.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळाचे सदस्य भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांनी गयानाच्या संसद अध्यक्षांची भेट घेऊन दहशतवादा विरोधातील भारताची भूमिका स्पष्ट केली.

खासदार श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळांनीही काल दक्षिण कोरिया, कुवेत, कतार, काँगो आणि स्लोव्हेनिया आदी विविध देशांच्या भेटी घेऊन दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट केली.

**<><><><><>**

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रताप जाधव यांच्या उपस्थितीत पुदुच्चेरी इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उलटगणतीच्या २५ दिवसीय कार्यक्रमाचं आज उद्घाटन करण्यात आलं. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या मुख्य सोहळ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विशाखापट्टणम इथल्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. तत्पूर्वी देशभरात विविध ठिकाणी योग दिनाच्या काउंटडाऊन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं विविध मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करणार आहेत. या वर्षी सरकारनं १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून त्यामध्ये ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्रीं चा समावेश आहे. पहिल्या समारंभात राष्ट्रपतींनी ७१ पद्म सन्मान प्रदान केले. आजच्या कार्यक्रमात ६८ मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करण्यात येतील.

**<><><><><>**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात २०२० हे पारंपारिक तत्त्वांचं जतन करुन भविष्याचा वेध घेणारं शिक्षण देण्यात येत असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान

यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत मिडीया नेटवर्क शैक्षणिक परिषदेत बोलत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भविष्यातल्या शिक्षणासाठी दूरदृष्टीने तयार केले असून देशातल्या शिक्षण क्षेत्रानं मोठी प्रगती केल्याचही त्यांनी म्हटलं आहे. यामध्ये पायाभूत सुविधा, सर्वसमावेशकता आणि आधूनिकतेला प्राधान्य देण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

निर्यात केंद्रित संच आणि विशेष आर्थिक क्षेत्रांमधल्या संचांमधून झालेल्या निर्यातीवर शुल्क माफी आणि कर योजने अंतर्गत दिले जाणारे लाभ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. १ जून पासून याची अंमलबजावणी केली जाईल. याआधी हे लाभ ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दिले जात होते. जागतिक बाजारात भारताची निर्यात क्षमता वाढावी हा या योजनेचा हेतू आहे.

**<><><><><>**

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज एक्स समाजमाध्यमावर पंडित नेहरु याचं स्मरण केलं आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, तसंच काँग्रेस नेते सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतर मान्यवरांनी दिल्लीत शांतिवन या पंडित नेहरूंच्या स्मृतिस्थळी जाऊन आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

देशात इंग्रजांचे राज्य असताना धार्मिक कार्य करुन देशाची सेवा करण्याचे कार्य उभे करत कोणतीही संस्था दीडशे वर्ष चालवणे हे काम सोपे नाही असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत माधवबाग मंदिराच्या दीडशेव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या संस्थेत वेद, उपनिषद आणि गीतेचा अभ्यास करण्याचे कार्य करण्याबरोबरच आरोग्य सेवा पुरवण्याचे कार्य व्हावं, अशी अपेक्षा  त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

जर्मनीत सुरू असलेल्या आयएसएसएफ कनिष्ठ विश्वकरंडक स्पर्धेत, भारतीय नेमबाज तेजस्विनीने महिलांच्या २५ मीटर स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत भारताने तीन सुवर्ण, चार रौप्य आणि चार कांस्यपदकासह अकरा पदके मिळवून आघाडीवर आहे.

**<><><><><>**

सिंगापूर इथे सुरु असलेल्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची मिश्र दूहेरी जोडी पहिल्याच फेरीत स्पर्धेतून बाहेर पडली आहे. तनिषा क्रास्टो आणि ध्रुव कापिला या जोडीचा चीनच्या झांग ची आणि चेंग झिंग या जोडीने १८-२१,१३-२१ असा पराभव केला. भारताची दुसरी मिश्र दुहेरीची जोडी अमृता प्रमथेश आणि आशिथ सूर्याही पहिल्याच फेरीत बाहेर पडले. त्यांचा जपानची जोडी सायाका होबारा आणि युची शिमोगामी यांनी ११-२१,१७-२१ असा सरळ गेममध्ये पराभव केला. महिलांच्या एकेरीतही भारताच्या मालविका बनसोडला पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

आय पी एल मध्ये आज लखनौ सुपर जायन्ट्स चा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू बरोबर होणार आहे.  हा सामना आज संध्याकाळी साडे सात वाजता एकाना स्टेडियम लखनौ इथं होणार आहे.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागाने आज कर्नाटक, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. छत्तीसगड, केरळ, पश्चिम बंगाल, मराठवाडा, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल,

अंदमान निकोबार बेटे, ओडिशा आणि ईशान्येकडील राज्यातही येत्या दोन ते तीन दिवसात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.  तर हिमाचल प्रदेश, दिल्ली, आंध्र प्रदेश, राजस्थान, हरियाणा, चंदीगड, ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागात विजा आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळाचा अंदाज वर्तवला आहे. आज हिमाचल प्रदेशात गारपीट होण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर पश्चिम राजस्थानमधील काही ठिकाणी दिवसा उष्णतेच्या लाटा आणि धुळीची वादळं येऊ शकतात, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**